महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : दुसरे अंक : ३३३ वा दिनांक : १६/११/२०२५ वार : रविवार

## दोन्ही भाऊ एकत्र आले तरच मुंबई ताब्यात येईल : ठाकरे गटाच्या नेत्याचे विधान



**मुंबई :** राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे वारे वाहत असताना आणि प्रचाराला वेग येत असतानाच, ठाकरे गटाचे नेते चंद्रकांत खैरे यांनी ठाकरे बंधुंच्या एकत्र येण्यावर मोठे विधान केले आहे. दोघे भाऊ एकत्र आले, तर मुंबई महापालिका आपल्या ताब्यात येईल, असे खैरे म्हणालेत. यासोबतच त्यांनी काँग्रेसला फटकारत, आघाडी धर्म पाळण्याचे आवाहन केले आहे. बिहार विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर, आगामी मुंबई महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर चंद्रकांत खैरे यांच्या विधानाला महत्त्व प्राप्त झाले आहे.

त्रिभाषा सूत्राचा अध्यादेश रद्द झाल्यानंतर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे हे प्रथमच एकाच व्यासपीठावर आले. या घटनेमुळेच आता ठाकरे गट आणि मनसे यांच्यात युती होणार असल्याची जोरदार चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे. उद्धव ठाकरे यांनी देखील अनेकवेळा दोन्ही बंधु एकत्र येणार असल्याचे सुतोवाच केले. मात्र, याबाबत अद्याप दोन्ही पक्षांकडून कोणतीही अधिकृत घोषणा झालेली नाही. अशात या युतीच्या चर्चेवर आता ठाकरे गटाचे नेते चंद्रकांत खैरे यांनी आपले स्पष्ट मत व्यक्त केले आहे.

नेमके काय म्हणाले चंद्रकांत खैरे?

चंद्रकांत खैरे यांनी ठाकरे बंधुंच्या युतीबाबत अत्यंत स्पष्ट शब्दांत आपली भूमिका मांडली. "दोन्ही ठाकरे बंधू (उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे) एकत्र आले, तर त्यामुळे मोठा फरक पडेल आणि त्यामुळे मुंबई महापालिकेवर विजय मिळू शकेल, हे कोणीही नाकारू शकत नाही," असे खैरे म्हणाले. त्यांनी मुंबईच्या राजकारणाची पार्श्वभूमी स्पष्ट करताना, "ही मुंबई शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांची आहे. त्यांच्यामुळेच मुंबई वाचलेली आहे, नाही तर या लोकांनी मुंबई कधीच तोडली असती," असेही नमूद केले. तेव्हाचे काँग्रेसचे सरकार असेल किंवा आताचे केंद्र सरकार असेल मुबई कशी काबीज करायची? असा त्यांचा प्रयत्न असतो. पण मराठी माणूस हा मराठी नेतृत्वाकडे पहात आहे, त्यामुळे दाव्याने सांगतो दोन्ही ठाकरे बंधू एकत्र आले तर मुंबई महापालिका ताब्यात येऊ शकते, असा आत्मविश्वास खैरे यांनी व्यक्त केला.

तडजोड न केल्यास भाजप डोक्यावर बसेल

चंद्रकांत खैरे यांनी यावेळी केवळ ठाकरे बंधूंना एकत्र येण्याचे आवाहन केले नाही, तर सध्याच्या राजकीय परिस्थितीत तडजोड करण्याची गरजही व्यक्त केली. सर्वच राजकीय पक्ष वेगवेगळे लढायला लागले आहेत, पण कुठेतरी ॲडजस्टमेंट करावी लागेल, कारण ही कार्यकर्त्यांची निवडणूक असते. सध्या डाऊन फॉल सुरू असला तरी आपल्याला निवडून येण्यासाठी तडजोड करावी लागेल, नाही तर भाजपा पुन्हा डोक्यावर बसेल, असे ते म्हणाले.

## ओबीसी महासंघाचे अध्यक्ष बबनराव तायवडे यांचा इलेक्शन कमिशनवर आरोप

**मुंबई :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये ओबीसींना कमी आरक्षण मिळाले आहे, असा आरोप राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे अध्यक्ष बबनराव तायवडे यांनी निवडणूक आयोगावर केला आहे. या प्रकरणी फेरविचार करावा अन्यथा कोर्टात जावू, असा इशारा त्यांनी दिला आहे.

राज्य निवडणूक आयोगाने २४६ नगरपरिषदा व ४२ नगरपंचायतींचा निवडणूक कार्यक्रम जाहिर केला. त्यानुसार, या दोन्ही संस्थांसाठी येत्या २ डिसेंबर रोजी मतदान होणार असून, ३ डिसेंबर रोजी मतमोजणी होऊन निकाल लागेल. या निवडणुकापूर्वीच ओबीसी महासंघाने हा आरोप केलाय.

नेमके प्रकरण काय?

निवडणूक आयोगाच्या परिपत्रकानुसार स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकात महापालिका क्षेत्रास ओबीसींसाठी ५० टक्क्यांपेक्षा जास्त आरक्षण मिळते. मात्र, राज्य निवडणूक आयोगाने ओबीसी जागांची मोजणी करताना अपूर्णांक दुर्लक्षित करण्याचे निर्देश दिले. त्यामुळे एका ओबीसी जागांचे नुकसान होते. हाच धागा पकडत राष्ट्रीय ओबीसी महासंघ आक्रमक झालेला दिसतो आहे.

मुख्यमंत्र्यांची भेट घेणार

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकात राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशामुळे ओबीसींचे नुकसान होते आहे. या निर्णयाचा फेरविचार करावा. अन्यथा कोर्टात जाणार असल्याचा इशारा बबनराव तायवडे यांनी दिला आहे. सोबतच या मुद्यावर ते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेटही घेणार आहेत. एससी, एसटी आरक्षणानुसार अपूर्णांक आल्यास ०.५० व त्यापेक्षा जास्त असलेला अपूर्णांक पुढील संख्येस पूर्णांकित करावे, अशी मागणीही त्यांनी केलीय. आता यावर राज्य निवडणूक आयोग काय भूमिका घेतो, हे पाहावे लागेल.

अशी होतेय निवडणूक

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया १० नोव्हेंबर रोजी सुरू झाली आहे. १७ नोव्हेंबर पर्यंत हे अर्ज दाखल करता येतील. त्यानंतर १८ नोव्हेंबर रोजी उमेदवारी अर्जांची पडताळणी होईल. अपिल नसलेल्या ठिकाणी अर्ज मागे घेण्याची मुदत २१ नोव्हेंबर अशी असेल. अपिल नसलेल्या ठिकाणी अर्ज मागे घेण्याची मुदत २५ नोव्हेंबर ही असेल. २६ नोव्हेंबर रोजी अंतिम उमेदवार यादी जाहीर होईल. याच दिवशी त्यांना निवडणूक चिन्हांचे वाटपही केले जाईल. त्यानंतर २ डिसेंबर रोजी नगरपरिषदा व नगरपंचायतींसाठी मतदान होईल. त्यानंतर दुसऱ्या दिवशी म्हणजे ३ डिसेंबर रोजी मतमोजणी होऊन निकाल जाहीर होईल. शासन राजपत्रात निकाल घोषित करण्याचा दिवस १० डिसेंबर असेल.

असे आहे आरक्षण

नगर परिषद आणि नगर पंचायतीसाठी कोकणात १७, नाशिक ४९, पुणे ६०, संभाजीनगर ५२, अमरावती ४५, नागपूर ५५ ठिकाणी निवडणूक होतेय. त्यात एकूण २४६ नगरपरिषद असून, ४ नगरपंचायती आहेत. या निवडणुकीसाठी एकूण ३,८२० प्रभाग आहेत, तर ६,८५९ जागा आहेत. यातील ३,४९२ जागा महिलांसाठी राखीव आहेत. अनुसूचित जातींसाठी जागा ८९५, अनुसूचित जमातींसाठी जागा ३३८, तर नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गासाठी १,८२१ जागा राखीव आहेत.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १६ नोव्हेंबर २०२५


## बिचारी म्हैस

काळी काळी म्हणून
म्हशीला चिडवायची सारी
म्हैस मनाशीच म्हणायची
मी कधी होणार गोरी

सर्वांचाच यायचा तिला
अस्सा मोठा राग
तळपायाची मस्तकाला
लगेच जायची आग

महागडी साबण लावली
फरक काही पडेना
दगडाने घासले अंग
तरी मनासारखे घडेना

बदाम तिने खाल्ले
हळदीचे पिले पाणी
काळी काळी म्हणून
पुन्हा पडे कानी

पार्लरमध्ये जाण्याचा
निर्धार तिने केला
पार्लरवालीला म्हणाली
आधी गोरं कर मला

पार्लरवालीने लावला तिला
फसा फसा चूणा
होणार नाही म्हणे
कधी काळी पुन्हा

नदीत डुबकी मारली
धावत धावत येवून
पित्त खवळले तिचे
काळा रंग पाहून




- रवींद्र चालीकवार
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६


## क्षणभराचं जीवन

क्षणभराचं जीवन वेड्या
रानफुलासम जगून घ्यावं
काळ्या पाषाणाला भेदून
मातीमध्ये उगवून यावं

उमलण्याचा क्षण सोनेरी
आयुष्याला पुरून उरावा
रानवाऱ्याच्या संगतीने
जीवनाला अर्थ मिळावा

ऊन वारा पावसाने
पाकळीचा रंग खुलावा
पावसाचा थेंब पडताच
अमृताचा मोहर यावा

जग जरी उन्हामध्ये
वनव्यात पेटलेलं
रानफुलांच्या गंधामध्ये
अंतरंगही उजळलेलं

मायमातीच्या कुशीत
रानफूल उमललं
क्षणभराचं जीवन
सार्थ करुनिया गेलं


ज्ञानेश्वर गायके
कन्नड
मो.9403384889


एमजे युटूब चॅनल

# ठाकरवाडीत, बिबट्याचा थरार भरवस्तीत केली कुत्र्याची शिकार



**कन्नड (अरुण थोरात):** कळंकी ता. कन्नड परिसरात बिबट्याच्या संचाराने नागरिकांत भीतीचे वातावरण असतानाच दि.१४ नोव्हेंबर रोजी रात्री ११:३० वाजेच्या सुमारास बिबट्याने गावातील ठाकरवाडी या मोठ्या आदिवासी वस्तीत शिरुन रतन मधे यांच्या पाळीव कुत्र्याची शिखर करित पळ काढला.शुक्रवारी रात्री ठाकरवाडी शांत झोपलेली असतांना रात्री साडे आकरा वाजेच्या सुमारास कुत्र्याची आरडाओरड ऐकून ग्रामस्थ जागे झाले, तो पर्यंत कचरु सखाराम मेंगाळ यांच्या घरा समोर बसलेल्या एका कुत्र्याचा बिबट्याने फडशा पाडला. आरडाओरडीने जागे झालेल्या राजाराम वाजे, इंदुबाई मध्ये, आशाबाई आगीवले, शाईनाथ मेंगाळ, व्दारकाबाई वाजे यांनी बिबट्याला हुसकावून लावण्यासाठी आरडा ओरड केली, या आवाजाने बिबट्याने कुत्रा तोंडात पकडून जवळच्या जंगल रानाच्या दिशेने धूम ठोकली. या घटनेने ग्रामस्थांत भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. गाव शिवारात अनेक बिबट्यांचे वास्तव्य असून दहा ते बारा पाळीव जनावरांच्या शिकारी केल्या आहेत. मात्र भर मानवीवस्तीत येउन पाळीव जनावराची शिकार करण्याची ही पहिलीच वेळ असल्याने पशुपालकांत चींतेचे वातावरण आहे. वनविभागाने शिवारातील सर्व बिबटे, रानडुक्कर पकडून न्यावीत. तात्काळ पिक नुकसान भरपाई द्यावी. अन्यथा आम्हाला आंदोलन करावे लागेल असा ईशारा सत्यशोधक ग्रामीण कष्टकरी सभेचे कन्नड तालुकाध्यक्ष कॉ. रतन मधे यांनी दिला आहे.

आता पर्यंत आमच्या कळंकी शिवारात दहा ते बारा पाळीव जनावरांच्या बिबट्याने शिकारी केल्या आहेत. शेतात अनेकांनी बिबटे प्रत्यक्षात पाहिले आहेत. आधीच आम्ही रानडुक्कर, हरिण, रोही, वानर आदी प्राण्यांकडून शेतमालाचे होणाऱ्या नुकसानी मुळे त्रस्त आहोत. बिबट्या भर वस्तीत येऊ लागल्याने आता गाव ही सुरक्षित राहिले नाही. या बिबट्यांसह सर्व उपद्रवी वन्यजीवांचा वनविभागाने तात्काळ बंदोबस्त करावा. शिवारातील सर्व खाजगी शेतीला तार कंपाऊंड करावे. बाजार भावा प्रमाणे नुकसानीची भरपाई एका महिन्याच्या आत द्यावी, पिक विमा संरक्षणात वन्यजीवां कडून होणाऱ्या नुकसानीचा समावेश करावा. नुकसान भरपाई मोबदला ठरविण्यासाठी स्थानिक समिती नेमून त्यात शेतकरी सदस्यांना प्रतिनिधीत्व द्यावे, डोंगराळग्रस्त भागातील शासकीय नंबर असलेल्या रस्त्यांच्या विकासासाठी वनविभाग परवानगी ची अट रद्द करावी.-

**दिनकर दाभाडे पाटील**
सामाजिक कार्यकर्ते, कळंकी

# इन्स्पायर अ‍ॅवार्ड प्रदर्शन सोहळ्याचे उद्घाटन

**छत्रपती संभाजीनगर :** विद्यार्थ्यांनी शालेय जीवनापासून विज्ञान निष्ठा जपावी. वैज्ञानिक दृष्टीकोन विकसीत करुन जीवन सुखकर करावे,असा हितोपदेश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी इन्स्पायर अ‍ॅवार्ड प्रदर्शन सोहळ्यास सहभागी विद्यार्थ्यांना केला.

भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभाग, नवी दिल्ली, महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मुंबई, तसेच राज्य विज्ञान शिक्षण संस्था, नागपूर यांच्या मार्गदर्शनाखाली व माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर आणि डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महाविद्यालय, समर्थ नगर, यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय इन्स्पायर अवॉर्ड प्रदर्शनाचे उद्घाटन सोहळा आज तापडिया नाट्यमंदिर येथे उत्साहात पार पडला. प्रदर्शनाचे उद्घाटन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या हस्ते झाले.

अध्यक्षस्थानी जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्य) श्रीमती अश्विनी लाठकर या होत्या. उपशिक्षणाधिकारी श्रीमती सीमा मेहेत्रे), प्राचार्य, डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महिला कला महाविद्यालय डॉ. सुनीता बाजपाई, जिल्हा विज्ञान पर्यवेक्षक दिलीप सिरसाट, समन्वयक डॉ. प्रभाकर गायकवाड आणि पर्यवेक्षिका प्रा. माधुरी भावसार उपस्थित होते.

जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की, 'अनेक महान वैज्ञानिकांच्या चरित्रामधून आपल्या लक्षात येते की, हे वैज्ञानिक विद्यार्थी दशेपासूनच प्रयोग करीत होते. सुरुवातीला त्यांचे प्रयोग उलट-सुलटेही झाले, पण अथक प्रयत्नानंतर त्यांनी यश मिळविले. त्यांच्या या संशोधनामुळे आज आपले जीवन सुखकर झाले आहे.

अशा प्रदर्शनातून सहभागी होणारे विद्यार्थी आज विविध संशोधन संस्थांमध्ये मोठ्या पदावर कार्यरत आहेत. या प्रदर्शनात सहभागी होणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांनाही वैज्ञानिक होण्याची खूप मोठी संधी या निमित्ताने मिळत आहे. आजही विविध सामाजिक माध्यमातून मोठ्या प्रमाणात अंधश्रद्धा पसरवली जात आहे. आपल्याला यावर मात करून विज्ञाननिष्ठ होणे अतिशय महत्त्वाचे आहे.' अध्यक्षीय समारोप करताना श्रीमती अश्विनी लाठकर यांनी केला.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने झाली, तर महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी व प्रा. शंकर विधाते यांनी स्वागत गीत सादर केले. प्रास्ताविक दिलीप शिरसाट यांनी केले. प्राचार्यडॉ. सुनीता बाजपाई यांनीहीमनोगत व्यक्त केले.सूत्रसंचालन डॉ. शिला जिरे यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. प्रभाकर गायकवाड यांनी केले.

या कार्यक्रमाला शिक्षण विस्तार अधिकारी श्रीमती कल्पना पातकोंडे, विविध महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य,प्राध्यापक, मुख्याध्यापक, विज्ञान शिक्षक,बालवैज्ञानिक, विद्यार्थी, पालक, यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी हळद व मिठाच्या रासायनिक अभिक्रियेतून सुवर्ण अक्षराने स्वतःचे नाव लिहून प्रत्यक्ष विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन केले. छत्रपती संभाजीनगर व जालना या दोन्ही जिल्ह्यांतील विविध शाळांमधून निवड झालेल्या 118 विज्ञान प्रकल्पांनी या जिल्हास्तरीय प्रदर्शनात सहभाग घेतला आहे.

दिनांक 13 व 14 नोव्हेंबर रोजी हे प्रदर्शन जिल्ह्यातील सर्व विद्यार्थी, शिक्षक आणि विज्ञानप्रेमींना खुले असणार आहे. या प्रकल्पातून निवड झालेल्या विद्यार्थ्यांना राज्यस्तरीय स्पर्धेत भाग घेण्याची संधी उपलब्ध होईल. जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागाच्या या पुढाकारामुळे छत्रपती संभाजीनगर व जालना जिल्हा यंदा विज्ञान-नवोन्मेषाचा केंद्रबिंदू ठरणार आहे. 'इन्स्पायर मानक अवॉर्ड' (प्रेरित संशोधनासाठी विज्ञानाच्या शोधात नवोपक्रम) ही केंद्र सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाची योजना असून, विद्यार्थ्यांमध्ये संशोधन वृत्ती, प्रयोगशीलता आणि नवोन्मेषी दृष्टिकोन वाढविण्यासाठी राबवली जात आहे.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १६ नोव्हेंबर २०२५


## निरगुडी बु ठाकरवाडीत जननायक धरती आबा बिरसा मुंडा यांची १५० वी जयंती उत्साहात साजरी



**खुलताबाद (सनिराम गावंडे) :** खुलताबाद तालुक्यातील निरगुडी बु ठाकरवाडी मध्ये १५० वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली बिरसा मुंडा यांचा जन्म १५ नोव्हेंबर १८७५ रोजी झारखंडमधील रांची जिल्ह्यातील उलीहातू गावात झाला. त्यांचा जन्म गुरुवारी (बिस्युतवार) झाल्यामुळे त्यांना 'बिरसा' असे नाव देण्यात आले. त्यांनी गोडगेडा येथील स्वामी आनंद पांडे यांना आपले गुरु मानले आणि त्यांच्याकडून मार्गदर्शन घेतले बिरसा मुंडा यांनी ब्रिटिश आणि जहागीरदारांच्या शोषणाविरुद्ध लढा दिला.त्यांनी'उलगुलान' (महाभयंकर उठाव) नावाची चळवळ सुरू केली, ज्याचा उद्देश आदिवासींना त्यांचे हक्क परत मिळवून देणे आणि त्यांच्या जमिनींचे संरक्षण करणे हा होता.बिरसा यांनी ब्रिटिश मिशनरींच्या धर्मांतराच्या कारवायांविरुद्ध धार्मिक चळवळही उभारली. त्यांनी लोकांना एकत्र आणून एक नवीन धर्म आणि सामाजिक व्यवस्था स्थापित करण्याचा प्रयत्न केला. ते आदिवासींमध्ये 'धरती अब्बा' म्हणजेच 'पृथ्वीचा पिता' म्हणून ओळखले जात बिरसा मुंडा यांना ब्रिटिश सरकारने अटक केली आणि ९ जून १९०० रोजी रांची तुरुंगात त्यांचा मृत्यू झाला.बिरसा मुंडा हे आदिवासींच्या स्वातंत्र्य चळवळीतील एक महत्त्वाचे व्यक्तिमत्त्व बनले. त्यांच्या कार्यामुळे आदिवासी समाजाला एक नवी दिशा मिळाली. भारत सरकारने त्यांच्या योगदानाला आदराने लक्षात ठेवण्यासाठी १५ नोव्हेंबरला 'जनजाती गौरव दिन' म्हणून साजरा करण्याची घोषणा केली.ही जयंती मोठ्या उत्साहात साजरी करतांना जि प प्रा शाळा ठाकरवाडी शाळेतील विद्यार्थी विद्यार्थीनी यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवला बिरसा मुंडा यांची विचारसरणी लक्षात घेवून आदिवासी संस्कृती निसर्गप्रेम जल जंगल जमीन इ बाबत प्रतिकृती केली निरगुडी बु चे सरपंच राणी चांडे ग्रामसेविका भारती पाटील ऑपरेटर दिपक चांडे शिपाई तांदळे गावाचे पोलीस पाटील गंगाराम मेंगाळ उपसरपंच पांडूरंग मधे जि प प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक लहाने सहशिक्षक श्री भालेराव श्री गालफाडे श्रीमती घोरपडे श्रीमती साबळे व शाळेतील सर्व कर्मचारी उपस्थित होते त्याचबरोबर ठाकरवाडीतील बाळु मधे वाळूबा मधे खंडू बांगारे जनाबाई मधे बंडू साळवे खंडू मधे हिरामण मधे साहेबराव मेंगाळ एकनाथ कातवारे शाम बांगारे विष्णू मधे ज्ञानेश्वर बांगारे तुकाराम मेंगाळ राजु गांगड भागिनाथ कातवारे अरुणाबाई मेंगाळ मंगलबाई मेंगाळ सखुबाई मधे मंगल साळवे इत्यादी ग्रामस्थ उपस्थित होते.

## इन्स्पायर मानक अवॉर्ड जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचा समारोप उत्साहात संपन्न




**छत्रपती संभाजीनगर :** जिल्हा परिषद माध्यमिक विभाग, छत्रपती संभाजीनगर आणि डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित इन्स्पायर मानक अवॉर्ड जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचा समारोप व पारितोषिक वितरण सोहळा तापडिया नाट्यमंदिर येथे मोठ्या उत्साहात पार पडला.समारोप कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक चे अधिक्षक श्री. राजू नेब यावेळी प्रमुख उपस्थिती प्राचार्या डॉ. सुनिता बाजपाई होत्या, आयोजक उपशिक्षणाधिकारी श्री. सिताराम पवार, उपशिक्षणाधिकारी सीमा मेहत्रे, जिल्हा विज्ञान पर्यवेक्षक श्री. दिलीप शिरसाठ, प्रा. माधुरी भावसार, डॉ. प्रभाकर गायकवाड, परीक्षक श्री. प्रतीक खराडे, श्री. भारत सोनावणे, श्री. निलेश वैद्य उपस्थित होते.आपल्या अध्यक्षीय समारोपात श्री. राजू नेब यांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या संधींची उदाहरणे देत विद्यार्थ्यांना नव्या जोमाने पुढे जाण्यास प्रोत्साहन दिले. इन्स्पायर प्रकल्पांवर आधारित अनेक विद्यार्थ्यांना कंपन्यांकडून रॉयल्टी मिळाल्याची उदाहरणे सांगून त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये नवप्रेरणा निर्माण केली. प्राचार्य डॉ. सुनिता बाजपाई म्हणाल्या की, जिल्हा परिषदेने आमच्या महाविद्यालयाला दिलेली ही जबाबदारी अभिमानास्पद असून अशा उपक्रमातून जिल्ह्यातील अनेक बालवैज्ञानिक घडतील आणि वैज्ञानिक दृष्टिकोन अधिक दृढ होईल.दोन दिवसीय प्रदर्शनाचा अहवाल समन्वयक डॉ. प्रभाकर गायकवाड यांनी सादर केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. ज्योती मंठाळकर यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. माधुरी भावसार यांनी केले.समारोप कार्यक्रमात दोन मनोगत सादर करण्यात आली. कु. अपर्णा जोशी – केंद्रीय विद्यालय श्री. कल्याण निहाळ – जिल्हा परिषद शाळा, जालना (मार्गदर्शक शिक्षक)यंदाच्या प्रदर्शनात राज्यस्तरावर निवड झालेल्या विद्यार्थ्यांची घोषणा करण्यात आली. शैक्षणिक वर्ष २०२३–२४ राज्यस्तरावर निवड विद्यार्थी १. अर्णव महर्षी २. अंजली केणे ३. शेख उमेर शेख तौफीक४. ओमेशा तुषार अहिरेशैक्षणिक वर्ष २०२४–२५ राज्यस्तरावर निवड विद्यार्थी . अर्णव रेड्डी संजीव रेड्डी, . राणी पुरुषोत्तम तुपे, पार्थ साहेबराव गायकवाड, आरूषी विजय काकरवाल, साक्षी रविंद्र नऱ्हेडाया सर्व राज्यस्तरावर निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे विभागीय शिक्षण उपसंचालक श्री कैलास दातखिळ सहाय्यक संचालक श्री रवींद्र वाणी आणि शिक्षणाधिकारी माध्यमिक श्रीमती अश्विनी लाटकर यांनी अभिनंदन केले आहे. या भव्य प्रदर्शनास उपशिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख, विज्ञान शिक्षक, पालक, विद्यार्थी, पत्रकार, विज्ञानप्रेमी तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. दोन दिवसात १५० शाळांचे सुमारे १५००० विद्यार्थी या विज्ञान महोत्सवाला भेट दिली . तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

## व्होट चोरी करूनही काँग्रेस संपवू शकला नाहीत : सचिन सावंत

**मुंबई :** काँग्रेसचे प्रवक्ते सचिन सावंत यांनी 'काँग्रेस मुक्त भारत'चे स्वप्न पाहणाऱ्या भाजप आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर जोरदार हल्ला चढवला आहे. नरेंद्र मोदी हे गेल्या ११ वर्षांपासून सगळ्या राष्ट्रीय तपास यंत्रणा आणि संवैधानिक संस्था वापरून 'व्होट चोरी' करूनही काँग्रेसला संपवण्यात अयशस्वी ठरले, अशी टीका सावंत यांनी केली.

सचिन सावंत म्हणाले की, काँग्रेस पक्ष १४० वर्ष सगळी वादळे सहन करून टिकून राहिला आहे. आम्ही इंग्रजांच्या विरुद्ध घाबरलो नाही, तर तुम्ही कोण आलात? असा थेट प्रश्न त्यांनी भाजपला विचारला. काँग्रेसला विभाजित करण्याचे कितीही प्रयत्न केले तरी ते यशस्वी होणार नाहीत, कारण काँग्रेस ही जनचळवळ आहे. समुद्रात काठी मारल्याने समुद्र विभाजित होत नाही, असे म्हटले आहे.

काँग्रेस प्रवक्ते सचिन सावंत म्हणाले की, काँग्रेस मुक्त भारताचे स्वप्न बघणारे नरेंद्र मोदी गेले ११ वर्षे सगळ्या राष्ट्रीय तपास यंत्रणा लावून आणि संवैधानिक संस्था वापरून व्होट चोरी करून अयशस्वी ठरले. काँग्रेस पक्ष १४० वर्षे सगळी वादळे सहन करुन टिकून राहिला आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १६ नोव्हेंबर २०२५


## काँग्रेस बिग ब्रदर नव्हे केवळ 'ब्रदर': वंचितचा काँग्रेसपुढे मैत्रीचा हात अन् टोला

**मुंबइ :** बिहार विधानसभा निवडणुकीत भाजप, ईव्हीएम व निवडणूक आयोगाच्या महायुतीचा विजय झाल्याचा घणाघात वंचित बहुजन आघाडीने केला आहे. वंचितने या प्रकरणी काँग्रेसला आपण मोठा भाऊ असल्याच्या भूमिकेतून बाहेर येण्याचाही सल्ला दिला आहे. काँग्रेसने मोठ्या भावाच्या भूमिकेतून बाहेर यावे. आम्ही तुम्हाला भाऊ मानू, तुमच्याशी युतीही करू. पण तुम्ही मोठे राहिला नाहीत, हे काँग्रेसने समजून घेतले पाहिजे, असे वंचितने म्हटले आहे.

बिहार विधानसभा निवडणुकीत भाजप - जदयु आघाडीचा दैदिप्यमान विजय झाला. यामुळे मुख्यमंत्री नितीशकुमार यांच्या नेतृत्वात तिथे एनडीएचे सलग ५ व्यांदा सरकार येण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. विरोधकांनी या निवडणुकीत मोठ्या प्रमाणात मतांचा गैरव्यवहार झाल्याचा आरोप केला आहे. त्यांच्या या सूरात आता वंचित बहुजन आघाडीनेही सूर मिळवला आहे.

प्रकाश आंबेडकर यांनीही बिहार निवडणुकीमुळे काँग्रेसने हिंदू व दलित मतदारांचा विश्वास गमावल्याचा दावा केला आहे. ते म्हणाले, काँग्रेसने हिंदू मतदार व दलित मदारांचा भरवसा गमावल्याचे बिहार निवडणुकीच्या निकालातून स्पष्ट झाले आहे. मी माझ्या पाटण्यातील पत्रकार परिषदेतही एनडीएच्या उलट महाआघाडीकडे कोणतेही मजबूत दलित नेतृत्व नसल्याचे म्हटले आहे. विश्वसनीय दलित नेतृत्वाशिवाय दलित समुदायाचा विश्वास जिंकणे शक्य नाही. कालच्या निकालातून माझी गोष्ट स्पष्ट झाली. काँग्रेसला दलित नेत्यांसोबत आघाडी करण्याची व हिंदू मतदारांसोबतचे आपले संबंध सुधारण्याची गरज आहे. असे न करण्याची असमर्थता किंवा त्यांचा अहंकार भाजपला जिंकण्यास मदत करत आहे.

काँग्रेसला खरोखरच भाजपचा पराभव करायचा असेल तर काँग्रेसला आपण मोठा भाऊ असल्याचे नाटक बंद करावे लागेल. तसेच वास्तविक सत्ता-भागिदारी व सर्वमान्य नेतृत्व स्वीकारावे लागेल, असे प्रकाश आंबेडकरांनी म्हटले आहे.

## श्रीकृष्ण महाविद्यालयात जननायक बिरसा मुंडा यांना अभिवादन




**उमरगा (प्रा. नागसेन कांबळे) :** तालुक्यातील गुंजोटी येथे श्रीकृष्ण महाविद्यालयात आदिवासी जननायक आद्य क्रांतिकारक बिरसा मुंडा यांच्या जयंती निमित्त राष्ट्रीय सेवा योजना व सांस्कृतिक विभाग यांच्या महाविद्यालयाच्या सभागृहात अभिवादनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेला प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले.नंतर सर्वांनी पुष्प अर्पण करून अभिवादन केले.या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थितीत डॉ.राम शेट्टी, डॉ .भास्कर शिंदे,डॉ.लक्ष्मण बिराजदार आणि डॉ.रमेश मांदळे उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गुलाब राठोड हे होते. याप्रसंगी बोलताना प्राचार्य डॉ. गुलाब राठोड म्हणाले की. बिरसा मुंडा हे आदिवासी समाजाचे अत्यंत क्रांतिकारी अशा पद्धतीचे नेते होते .आज अनेक अभ्यासकांच्या संशोधनानंतर ते इंग्रजा विरुद्ध लढणारा आद्य क्रांतिकारक म्हणून इतिहासात त्यांची नोंद केली जाते .जंगल ,जल आणि जमीन यांचे संरक्षण करण्यासाठी आणि प्रखर राष्ट्रवाद जोपासण्यासाठी बिरसा मुंडा यांनी आपल्या जीवाचे रान केले.

दुर्दैवाने इतिहासात जाणीवपूर्वक त्यांची नोंद केली गेली नाही ,परंतु बिरसा मुंडा हे आदिवासींच्या हक्क आणि अधिकारासाठी अत्यंत प्रखर असा लढा दिला.देशाभिमान स्वीकारला. त्यामुळेच त्यांचे भारत स्वातंत्र्य लढ्यातील स्थान अतुलनीय असे आहे .इतिहासात अशा अनेक लुप्त झालेल्या विभूतीनी भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात आपले योगदान दिले आहे. त्यांच्या जयंतीनिमित्त मी त्यांना व त्यांच्या विचारांना विनम्र अभिवादन करतो.

असाच प्रखर राष्ट्रवाद आपण आपल्या अंगी जोपासला पाहिजे असे त्यांनी आवाहन केले.विद्यार्थ्यांनी त्यांच्यापासून प्रेरणा घेऊन आपले जीवन अधिक दैदिप्यमान केले पाहिजे असे आवाहन केले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.भाऊसाहेब उगले यांनी केले तर आभार प्रदर्शन राष्ट्रीय सेवा योजनेच्या समन्वयक डॉ. मल्लमा आंबुसे यांनी मांडले .राष्ट्रगीता नंतर कार्यक्रमाची सांगता झाली. या कार्यक्रमाला शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.







# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १६ नोव्हेंबर २०२५

## मनपा प्रा. व मा. विद्यालय चिकलठाणा या शाळेमध्ये सहज योग सहज योगाद्वारे स्व चे तंत्र जाणूया हा उपक्रम घेण्यात आला



**छत्रपती संभाजीनगर :** दिनांक 15 नोव्हेंबर 2025 या दिवशी महानगरपालिका प्राथमिक व माध्यमिक विद्यालय चिकलठाणा या शाळेमध्ये सहज योग सहज योगाद्वारे स्व चे तंत्र जाणूया हा उपक्रम घेण्यात आला.

यासाठी श्री ऋषिकेश सुरवसे असेच हिरा संजय गाडे मॅडम या दोघांनी विद्यार्थ्यांना योगाचे महत्व उत्कृष्टरित्या समजावून सांगितले. विद्यार्थ्यांकडून योगाचे प्रात्यक्षिके करून घेण्यात आली. रोज योगा केला पाहिजे त्यामुळे आपले शारीरिक मानसिक बौद्धिक या सर्व गोष्टींचा विकास होतो.

जेवणामध्ये सकस आहाराला महत्त्व दिलं पाहिजे त्यामुळे आपल्या आरोग्य सुदृढ राहते. या कार्यक्रमासाठी शाळेतील मुख्याध्यापक श्री शिंदे सर श्री राठोड सर श्री पठाण सर श्रीमती भारद्वाज मॅडम श्रीमती भिंगोले मॅडम श्रीमती शिंदे मॅडम श्रीमती फुलंब्रीकर मॅडम श्रीमती राऊत मॅडम यांची उपस्थिती होती.

# आम्ही पालकांकडून मतदान करून घेणारचविद्यार्थ्यांचा निर्धार



**कन्नड (अरुण थोरात):** कन्नड येथील काशिनाथ पाटील जाधव प्राथमिक विद्यालयात बाल दिनाच्या निमित्ताने कन्नड नगरपालिकेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने मतदार जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी एकनाथ बंगाळे, स्वीप पथकाचे योगेश पाटील, प्रतिभा कदम यांचा विद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला.निवडणूक निर्णय अधिकारी एकनाथ बंगाळे यांनी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, निवडणुकीमध्ये निर्भय व निस्वार्थपणे मतदान करणे हे प्रत्येकाचे राष्ट्रीय कर्तव्य आहे.

त्यामुळे तुम्ही आपल्या पालकां कडून येणाऱ्या नगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये शंभर टक्के मतदान करून घ्यावे असे आव्हान केले.यावेळी विद्यालयाचे प्रशासकीय अधिकारी सचिन भामरे, जगमोहन मुंडवाडकर, भगवान म्हैसमाळे, ज्ञानेश्वर नायकुडे, संतोष आग्रे, सुभाष जाधव, सुनिता बाविस्कर यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनिता दाबके यांनी केले तर आभार लक्ष्मण पांडव यांनी मानले.

**१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा) विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी**

**D.M.L.T**

**Diploma In Medical Laboratory Technology**

- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

**मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.**

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903

# शहरात दोन ठिकाणी कार्यशाळेचे आयोजन : यशोधरा बुद्ध विहार व फुशाआ स्टडी फाउंडेशनचे जनसंपर्क कार्यालय

**छत्रपती संभाजी नगर (प्रतिनिधी) :** आपण सर्वांना याद्वारे कळविण्यात येत आहे की, १६ नोव्हेंबर २०२५, रविवार ला दोन सत्रात वेगवेगळ्या ठिकाणी फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशन व यशोधरा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित सांस्कृतिक उप समितीच्या संयुक्त विद्यमाने वैचारिक प्रबोधनात्मक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आलेले आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

१४३ वी कार्यशाळा :वेळ : सकाळी १०:०० वाजता, रविवार.स्थळ : यशोधरा बुद्ध विहार, यशोधरा कालनी, एन-८, सिडको, छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र. विषय : मानवी दु:ख निवारणाचा मार्ग दाखविणे हे बुद्ध धर्माचे अंतिम ध्येय आहे. करिता अपुरे विद्यार्जन उपयोगाचे नाही. __

डॉ. बाबासाहेब आंबेडकर या कार्यशाळेला यशोधरा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित सांस्कृतिक उपसमिती च्या मुख्य समन्वयक संगीता गडवे या उद्घाटनपर मार्गदर्शन करणार असून धम्ममित्र रामहरी निकाळजे हे प्रमुख वक्तते म्हणून मार्गदर्शन करणार आहेत. ही कार्यशाळा संचालक बी. बी. मेश्राम यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे.

१४४ वी कार्यशाळा : १५० व्या बिरसा मुंडा जयंती निमित्त.वेळ : दुपारी १:३० वाजता, रविवार, स्थळ : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनचे कार्यालय, ४, साकेत नगर, भावसिंगपुरा रोड, छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र. विषय : बिरसा मुंडा ते आंबेडकर शोषितांच्या मुक्तीसाठीचा संघर्ष.या कार्यशाळेला बुलढाणा येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. शिवाजी भिसे हे उद्घाटन पर मार्गदर्शन करणार असून फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनचे समन्वयक डॉ. व्ही. एच. कांबळे हे प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करणार आहेत.

ही कार्यशाळा समन्वयक प्रा. विलास कटारे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे. या दोन्ही कार्यशाळेत नोंदणीकृत सर्व प्रतिनिधींना आपले मत व्यक्त करण्याची संधी दिली जाणार आहे. करिता ९४२१६७८६२८,९९६०३४६०५४, ८८०६३८४११५, ८९८३०८२१२८, ९७६३७६५४०३,७२७६१५५७२३ , ९८२२७७१९१९ या क्रमांकावर नोंदणी करावी. तरी आपले मत पटवून देण्यासाठी व इतरांची मते समजून घेण्यासाठी आपण मित्र परिवारासह उपस्थित राहावे. असे फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशन व यशोधरा बुद्ध विहार सांस्कृतिक समितीच्या वतीने कळविण्यात आले आहे.

**शब्दांकन : मेश्राम बी. बी.**

संचालक : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशन, छत्रपती संभाजी नगर @9421678628, 8983082128.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १६ नोव्हेंबर २०२५


# सहिष्णुता : मानवतेला एकत्र ठेवणारे जीवनमूल्य

मानवी समाजाचा विकास हा केवळ भौतिक प्रगतीवर अवलंबून नसतो; त्यामागे काही मूलभूत मूल्यांची भक्कम पायाभरणी असते. या मूल्यांपैकी सर्वात महत्त्वाचे मूल्य म्हणजे सहिष्णुता होय. 16 नोव्हेंबर रोजी जगभरात साजरा केला जाणारा ‘आंतरराष्ट्रीय सहिष्णुता दिन’ हा विविधतेचा सन्मान करणाऱ्या मानवतावादी दृष्टीकोनाला अधोरेखित करणारा दिवस आहे. सहिष्णुता म्हणजे केवळ एकमेकांना सहन करण्याची वृत्ती नाही; तर भिन्न मत, संस्कृती, परंपरा, श्रद्धा आणि जीवनशैलींची सकारात्मक जाण करून घेणे, त्यांचा सन्मान राखणे आणि परस्पर संवादाच्या माध्यमातून समाजातील ऐक्य मजबूत करणे ही प्रक्रिया आहे. समाजशास्त्राच्या दृष्टीने सहिष्णुता ही सामाजिक स्थैर्याची, लोकशाहीची आणि शांततामय सह-अस्तित्वाची सर्वात मोठी हमी आहे. मानवजातीचे भवितव्य सुरक्षित ठेवण्यासाठी सहिष्णुता ही केवळ आवश्यकता नसून, ती मानवतेचा मूलाधार आहे.जग विविधतेने परिपूर्ण आहे. प्रत्येक प्रदेश, समाज, समूह आणि संस्कृतीची स्वत:ची वेगळी ओळख आहे. इतिहास, भाषा, धर्म, वंश, भूगोल आणि आर्थिक परिस्थिती यामुळे मानवी जीवनशैलीत मोठी भिन्नता दिसते. या भिन्नतेला आपण विविधता म्हणतो. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून ही विविधता समाजासाठी एक संपत्ती असते, कारण ती नवनवीन विचारांचे, ज्ञानाचे, मूल्यांचे आणि सामाजिक परिवर्तनांचे द्वार उघडते. तथापि, विविधता आणि सहिष्णुता या एकमेकांशी निगडीत संकल्पना आहेत. विविधतेला स्वीकारण्यासाठी सहिष्णुता हा आधारभूत गुण आवश्यक आहे. ज्या समाजात विविधतेविषयी अविश्वास, भीती किंवा तिरस्कार आढळतो, ते समाज संघर्ष, अस्थिरता आणि विघटनाच्या दिशेने झुकतात. म्हणूनच सहिष्णुतेचे अस्तित्व कोणत्याही बहुविध समाजासाठी जीवनावश्यक ठरते.आजच्या काळात तंत्रज्ञानामुळे लोक एकमेकांच्या जवळ आले तरी मनांच्या दऱ्या मात्र वाढताना दिसतात. सोशल मीडिया आणि डिजिटल माध्यमे विचारस्वातंत्र्याला वाट मुक्त करतात, परंतु त्याचबरोबर चुकीच्या माहितीचे, कट्टरतेचे आणि ध्रुवीकरणाचे प्रभावही वाढवतात. समाजशास्त्रीय भाषेत याला ‘इको चेंबर’ म्हणतात. ज्यात व्यक्ती आपल्या मताशी जुळणारीच माहिती पाहते आणि भिन्न मतांबद्दल असहिष्णुता वाढते. अशा मानसिकतेमुळे समाजातील विविध गटांमध्ये ‘आपण विरुद्ध ते’ असा भाव तीव्र होतो. त्यामुळे सहिष्णुता ही आजच्या माहिती-युगात अधिकच महत्त्वाची ठरते. एखाद्याचे मत, श्रद्धा किंवा विचार आपल्या मतांपेक्षा भिन्न आहेत म्हणून ते चुकीचेच असतात असे मानणे म्हणजे सामाजिक बंध अधिकच नाजूक करणे होय. त्यामुळे सहिष्णुता ही जागतिक शांततेची आणि सामाजिक सौहार्दाची सर्वात मोठी गुरुकिल्ली ठरते.भारतीय समाजाच्या संदर्भात सहिष्णुतेचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. भारत हा जगातील सर्वात बहुरंगी आणि सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध देश आहे. धर्म, भाषा, जात, उपजाती, ग्रामीण-शहरी फरक, वेशभूषा, खाद्यसंस्कृती, परंपरा या सर्व स्तरांवर भारतात असामान्य विविधता दिसते. ही विविधता भारतीय समाजाची ताकद आहे आणि तिचे अस्तित्व टिकवून ठेवण्याची गुरुकिल्ली म्हणजे सहिष्णुता होय. भारताचा इतिहास पाहिला तर येथे अनेक राजवटी, अनेक संस्कृती, अनेक श्रद्धा आणि अनेक परकीय प्रभाव आले, परंतु भारताने या सर्वांना आत्मसात करून सामाजिक-सांस्कृतिक समृद्धी निर्माण केली. बौद्ध-अहिंसावाद, जैन धर्मातील करुणा, सूफी संतांचे प्रेमसूत्र, भक्ती चळवळीतील समता-विचार आणि आधुनिक भारताच्या संविधानातील धर्मनिरपेक्ष मूल्ये यामुळे भारतात सहिष्णुतेची भक्कम परंपरा तयार झाली आहे.संविधानाने दिलेली स्वातंत्र्य, समानता, बंधुता ही मूल्ये सहिष्णुतेला संस्थात्मक रूप देतात. प्रत्येक व्यक्तीला धर्मस्वातंत्र्याचा, अभिव्यक्तीस्वातंत्र्याचा आणि जीवनपद्धतीचा अधिकार दिला आहे. कोणत्याही धर्म, जाती किंवा वर्गाविरुद्ध भेदभाव न करता समतेची पायाभरणी केली आहे. समाजशास्त्रीय दृष्टीने पाहता ही मूल्ये विविधतेला संरक्षण देतात आणि सहिष्णुतेच्या माध्यमातून समाजाला एकत्र बांधतात.सहिष्णुतेचे महत्त्व केवळ सामाजिकच नाही, तर आर्थिक आणि राजकीय क्षेत्रातही दिसून येते. सहिष्णु समाजांमध्ये आर्थिक प्रगतीचा वेग जास्त असतो, कारण भीती, असुरक्षितता आणि संघर्षातील ऊर्जा खर्च न होता लोक सर्जनशीलतेमध्ये, उत्पादनक्षमता वाढविण्यासाठी आणि नवोन्मेषासाठी कार्य करतात. राजकीय पातळीवर सहिष्णुता लोकशाहीला बळकटी देते. मतभिन्नता हा लोकशाहीचा आत्मा आहे. त्या मतभिन्नतेला संवाद, चर्चा आणि समजूतदारपणे हाताळण्याची क्षमता ही सहिष्णुतेतूनच उद्भवते.सहिष्णुतेच्या अभावामुळे जगभरात अनेक लढाया, संघर्ष आणि हिंसक घटनांचा इतिहास तयार झाला आहे. धार्मिक कट्टरता, जातीय संघर्ष, स्थलांतरितांविरोधी हिंसा, दहशतवाद, राजकीय विवाद या सर्व प्रवृत्ती असहिष्णुतेतूनच जन्म घेतात. समाजशास्त्र सांगते की असुरक्षितता, निराशा, संसाधनांची कमतरता आणि ओळखीवरील धोक्याची भावना यामुळेही लोक असहिष्णु होतात. त्यामुळे सहिष्णुता वाढवायची असेल तर सामाजिक न्याय, संधी-समानता, आर्थिक सुरक्षितता आणि शिक्षण या सर्व घटकांची सुधारणा आवश्यक ठरते.शिक्षण हा सहिष्णुता निर्माण करण्याचा सर्वात महत्त्वाचा मार्ग आहे. शाळा-विद्यापीठे ही केवळ ज्ञानाची देवाणघेवाण करणारी केंद्रे नसून सामाजिक मूल्ये, नैतिकता, सहजीवन आणि जगण्याच्या संस्कृतीचे शिल्पकार आहेत. मूल्याधिष्ठित शिक्षण, संविधानिक मूल्यांचे शिक्षण, सांस्कृतिक आदानप्रदान, भेदभावविरोधी शालेय वातावरण आणि विविधतेबद्दलची सकारात्मक जाणीव ही सर्व तत्त्वे मुलांमध्ये सहिष्णुता बिंबवतात. कुटुंबात दिले जाणारे संस्कारही तितकेच महत्त्वाचे आहेत. मुलांना विविधता स्वीकारण्याची शिकवण, भिन्न विचार समजून घेण्याची सवय आणि परस्परसन्मानाचे वर्तन शिकवले तर समाज अधिक शांत आणि सुदृढ होऊ शकतो.माध्यमांची भूमिका या प्रक्रियेत अत्यंत निर्णायक आहे. माध्यमांनी सनसनाटीपणाचे, द्वेषाचे किंवा विभाजनाचे वातावरण निर्माण न करता तथ्याधिष्ठित, संतुलित आणि सकारात्मक संदेश देणे आवश्यक आहे. सांस्कृतिक आणि सामाजिक संस्था विविध समुदायांना एकत्र आणून परस्पर-संवादाची भावना मजबूत करू शकतात. सामाजिक उपक्रम, युवकांचे आदानप्रदान, सांस्कृतिक महोत्सव, बहुभाषिक उपक्रम या सर्व माध्यमांतून सहिष्णुतेची जाणीव अधिक प्रभावीपणे पसरू शकते.आज जग एका अशा टप्प्यावर उभे आहे जिथे भौतिक प्रगती भरगच्च आहे, पण मानसिकता संकुचित होताना दिसते. मानवी नातेसंबंधांत तणाव वाढत आहे, आर्थिक-सामाजिक असमानता तीव्र होत आहे, आणि सांस्कृतिक भिन्नतेविषयी असहिष्णुता अनेक ठिकाणी भीषण स्वरूप धारण करत आहे. अशा काळात सहिष्णुतेचा संदेश एका दीपस्तंभासारखा आहे जो अंधारातही योग्य दिशा दाखवतो.आंतरराष्ट्रीय सहिष्णुता दिन हा केवळ स्मरणदिवस नाही; तर मानवी समाजाला भेदभावापासून मुक्त, शांतता आणि सह-अस्तित्वाच्या मार्गाने पुढे नेण्याची जागतिक प्रतिज्ञा आहे. सहिष्णुता म्हणजे आपली ओळख विसरणे किंवा अन्याय सहन करणे नव्हे; तर समता, संवाद, परस्परसन्मान आणि मानवतेला केंद्रस्थानी ठेवून जगणे ही एक जागरूक सामाजिक वृत्ती आहे. मतभेद असणे हे स्वाभाविक आहे; पण मतभेदांवर द्वेष निर्माण होऊ नये, हीच सहिष्णुतेची खरी कसोटी आहे.शेवटी, सहिष्णुता हे मानवतेचे सर्वात सुंदर मूल्य आहे. ती माणसाला माणसाशी जोडते, समाजाला संतुलित ठेवते आणि विविधतेला हृदयपूर्वक स्वीकारण्याची क्षमता देते. जर सहिष्णुता समाजाच्या मूलभूत भावनेत स्थान मिळाले, तर लोकशाही अधिक सक्षम होईल, सामाजिक सौहार्द अधिक दृढ होईल आणि जागतिक शांततेची स्वप्ने अधिक वास्तववादी वाटू लागतील.16 नोव्हेंबरचा हा दिवस आपल्याला पुन्हा एकदा स्मरण करून देतो की सहिष्णुता ही उद्याची नव्हे, तर आजचीच गरज आहे. म्हणूनच प्रत्येकाने आपल्या विचारांमध्ये, वर्तनात आणि सामाजिक संबंधांमध्ये सहिष्णुतेचे मूल्य जपले पाहिजे. कारण सहिष्णुतेतच मानवतेचे भविष्य दडले आहे, आणि सहिष्णुतेतच जग अधिक सुंदर, सुरक्षित आणि समतेने परिपूर्ण होण्याची आशा आहे.




**डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(समाजशास्त्राचे अभ्यासक)**
**मो. क्र. 9960103582**
**bagate.rajendra५@gmail.com**



**बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002**

**महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.**
**कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.**
**संपर्क क्र. 7588005002**

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १६ नोव्हेंबर २०२५

# निमित्तमात्र : वास्तवाचे सजग भान देणाऱ्या कथा




निमित्तमात्र:-(कथासंग्रह ) संदिप राक्षे प्रकाशक:-परिस पब्लिकेशन, पुणे मुखपृष्ठ:- अरविंद शेलार आवृत्ती पहिली:- 5नोव्हेंबर 2025मुल्य:-400/ रूपये पुस्तक परिचय:- डॉ प्रभाकर शेळके, जालना संपर्क:- 9975137337

सकारात्मक विवेकी विचारांचा दिप लावून सं दिपक आयोजन, संयोजन, प्रयोजन करुन कर्म दिपक लावणे.हा महत्वाचा मुळ आशय घेऊन सृजनशील स्नेहाळू भावनेतून फक्त निमित्तमात्र.ही आजच्या अनुभवाची शिदोरी लेखक संदिप राक्षे यांनी वाचकांच्या हाती दिली आहे.या कथासंग्रहाचे प्रकाशन ज्ञानेश्वर माऊली महाराज साहित्य संमेलनात भव्य प्रमाणात सर्व साहित्यिकाच्या शुभहस्ते करण्यात आले.नेत्रदिपक असा हा सोहळा संपन्न झाला..निमित्तमात्र...ही 'मात्रा' माणुसकी जगण्याची आहे.एकूणया जगरहाटीचा हा अतिशय मार्मिक मर्मतेचा कथानुंबधआहे.मनोगतचं हे इतके चिंतनीय आहे "लेखन ही केवळ शब्दाची रचना नसून,मन उलगडणारी खरी कलाकृती आहे.कथा लेखन आपल्याला जीवनाच्या कठीण प्रसंगी उभं राहण्याचं बळ देते.आणि आपले मन नेहमी सकारात्मकतेने भरुन टाकते.मनुष्याच्या जीवात 'निमित्य'या शब्दाला अनन्य स्थान आहे.माणुसं निमित्तमात्र असतो.कर्ता करविता ईश्वर असतो.आपण कोणत्याही गोष्टीचे श्रेय घेऊन मोठेपणा मिरवत बसलो तर, त्यातून काहीच निष्पन्न होत नाही.निमित्तमात्र या कथासंग्रहात अतिशय मौलिक विचारांची पखरण केली आहे.अतिशयचिंतन आशय संपन्न सृजन समर्पक विवेचक कथा होताना वाचकाभिमुखता तिला लाभते ती अशी"आपण म्हणजे पाण्याचे थेंब निमित्तमात्र" बाई मी देव नाही.मी फक्त निमित्तमात्र आहे."बाळा आयुष्य म्हणजे आपली मालकी नाही.कुणाच्या आयुष्यात काय घडावं? हे ठरवणारा दुसराच आहे.आपण फक्त निमित्तमात्र"(पृष्ठ 17)या कथा म्हणजे एक प्रेरणादायी विचार आचरणातून आलेल्या आहेत.कथासुत्र म्हणजे आजच्या समकालीन वास्तवाचे खरे जग.ही सजगता त्यांच्या मुलभूत चिंतनातून आली आहे.त्यांनी वाचन व साक्षात माणुसं म्हणून अंतरंगी माणुसकीचा गहिवर जोपासला आहे.आज प्रत्येकाच्या हातात भ्रमणध्वनी आला.यावर पडणारे संदेश मानवी मनाचे शुद्ध फेसबुक केले आहे.मग वाचावे व सुख शोधावे पण तसे होत नाही.मैत्रीच्या नात्याचा ताळमेळ बिघडला आहे.'विज्ञानाचे सृजन- ज्ञानेश्वरी' मनपट=जगाचे आरसे,ओवी+कंपन=ऊर्जा .. मनातल्या अद्वैत अदम्य् इच्छेला ब्राम्हांड नायकाकडे मागीतले आणि प्रयत्नाने ते साध्य झाले.गौरव राक्षे यांची 'रणझुंजार'ही कादंबरी देशाचे नेते मा.शरदपवार यांच्या शुभहस्ते प्रकाशन झाली.'नवं स्वराज्य' या कथेचा आत्मा हा अत्यंत वास्तववादी आहे.'खरी ताकद म्हणजे प्रज्ञा,कष्ट, संघर्षातून उभं राहण्याची जिद्द असावी 'पुस्तक म्हणजे खरी तलवार आहे.या कथासंग्रहात हे सुत्र मानवी मूल्यांची साक्षेपी मिमांसा करते.म्हणून त्यांच्या कथा ह्या आजच्या वास्तव कथा आहेत.ज्या माणूसंपण जपण्यास लावतात.'निमित्तमात्र' जो स्वत:ला कर्ता समजतो तो अहंकारात जगतो.स्वप्नांची बीजे,तो कुठल्या मातीत जन्माला हे महत्त्वाचे नाही.त्याने स्वत:ची ओळख कुठपर्यंत घेऊन गेला.समाजाप्रती त्याचे दायित्व असले पाहिजे.'विज्ञानाचे सृजन - ज्ञानेश्वरी'ही कथा अध्यात्म आणि विवेक साधना ही मनुष्य जीवाशी किती कशी निगडित आहे.जसे ओवी+कंपन=अनंत ऊर्जा, पाणी+ओवीचा कंपन=अनंत प्रकाश. म्हणजे ज्यांनी ज्ञान साधक झाले त्याचे जीवन सत्कारणी लागले.ज्ञानेश्वरीची साधना कृती उक्तीतून करणे म्हणजे विज्ञान विश्वास..'नवस्वराज', "नको आम्हा जाती पाती, आम्हा साली प्रेमाची नाती"या कथेतील नायक आजच्या ग्रामीण वास्तवाचे भान देणारे आहे.यातून महाराष्ट्र धर्माची खरी दिशा दाखवणारी ही गोष्ट आहे.'कर्मातला ईश्वर!"कर्मातच पांडुरंग आहे, कर्मातच पुजा आहे,देव दगडात नाही देव प्रत्येक जीवात आहे.ही कथा मानवी मनाला हेलावून टाकते.सत् कर्म करीत रहा.आजही समाजातील व्यथावेदनेची अस्वस्थता कायम आहे 'देवदासी'या कथेचा अनुबंध हा सावित्रीमाईचा संघर्ष मांडते.ही देवदासी आता एका विधिज्ञ वकीलीन मुलीची आहे.रंगू देवदासी चं आयुष्य.मुलीच्या शिक्षण संघर्षाने बदलतं.'हिरवी प्रतिज्ञा'सागर या युवकाने केलेली प्रतिज्ञा प्रत्येक्षात करून दाखवली.'गावाचं नावंच बदलून टाकलं 'हिरवा आदर्श ग्राम'.'आर्त हाक मुलींची' या कथेचा आशय आत्मा "जन्मा आधी खुडतो कशाला उगीच पाप तू करतो कशाला मुलगा असला तुझ्या वंशाला पण मी आहे पणती घराला "(पृष्ठ 59)'मी तूझ्यासाठी ओझं नाही रे ये बाबा!मला ही तू जन्म घेऊ दे!'खरचंमुलगी घराची पणती असते..कन्येच दान करणारा आत्मा हा पुण्यवंत होतो.'हरिपाठाची दिव्यशक्ती' ही अतिशय लक्षवेधी मनोभूमिका सांगणारी अध्यात्मिक कथा."देवाचिया द्वारी उभा क्षणभरी तेणे मुक्ती चारी साधियेल्या"हरि मुखे म्हणा हरि मुखे म्हणा असोनि संसारी जिव्हे वेणू करीवेद शास्त्र उभारी बाह्या सदा!!'पुण्याची गणना कोण करी!!'जेव्हा एखाद्या व्यक्ती सततहरिपाठ जपते तेव्हा तिच्या मेंदूत पॅरासिंपथेटिक नर्व्हस सिस्टिम सक्रिय होते.जे तनाव कमी करते आणि शरीराला शांततेची अवस्था देतं'हा वैज्ञानिक दृष्टिकोन ही कथा देऊन जाते.'लोकशाहीचा चौथास्तंभ' या कथेत समकालीन वास्तवाचे सम्यक दृष्टीचे दर्शन घडते."पत्रकार विकले गेले तरी,सत्य विकत घेता येत नाही" या कथेचा नायक अत्यंत निस्सीम पत्रकारीतेची भक्ती करणारा आहे.त्याला एखादे वर्तमानपत्र केवळ राजकीय नेत्यांचे बटीक म्हणून राहत असेल तर त्याचा निश्चितच निषेध.याच आशयाची 'भ्रष्ट यंत्रणा 'अदित्य देशमुख नावाचा सत्य अधिकारी इथल्या भ्रष्ट राजकारण्यांची समुळ पोलखोल करतो."साहेब, भ्रष्टाचार महाराष्ट्राच्या रक्तात भिनलेला आहे!मंत्री महोदय इतिहास आठवा.नेते भ्रष्टाचाराने पैसे कमवणं पाप समजत होते.नतदृष्ट नेते भ्रष्ट झालेत खाष्ट.खातेत उष्ट.असा हा कथेचा बाज आहे.'आजाराचा बाजार'ही अतिशय वेदनादायक कथा.रामभाऊ आपल्या बायकोला ताप येते म्हणून घेऊन जातो.साध्या तापाचे निदान करायचे तर आजच्या दवाखान्यात चारपाच हजार रुपये रक्त,लघवी,पेशी सलायन याचे खोटे निदान दाखवून फक्त पैसे लुटायचे.आजच्या दवाखान्याचा 'आजाराचा बाजार' भरलेला आहे.'नको नको मना' या कथेतील दादूरोज मच्छीमार करून उपजीविका करणारा नायक.त्याला फोन येतो.तुझा जीवश्य कंठश्य मित्र मेला.श्रीमंत मित्र दारूचे वेसनं,वाईट नाद.कडणी फेल,दुबार किडनी.तरी वेसन सुटले नाही.'म्हणून मन करा रे प्रसन्न सर्व सिद्धीचे कारण'मनाती नकारात्मक विचार काढून टाका.'ब्रम्हांड ऐकते मनाची हाक' या कथेत आपल्या सृजनशील भावनेचा ओलावा म्हणजे आपण जे मनाने निर्मळ नितळ निर्लेप निस्पृह भावनेतून ते साकार होणे म्हणजेच ब्राह्मंडाने आत्म्याची हाक ऐकणे.हे साक्षात कथेचं रुपड.'सह्याद्रीचं रत्न'झाडं जगली पाहिजे.या सह्याद्रीचा श्वास कधीच थांबू देणार नाही ही शपथ ही कथा देते.'साहित्य सोनियाच्या खाणी' साहित्य हे फक्त कथा कविता नाहीतर, जीवन उजळवणारं दीप आहे.अनिकेतकथा नायक आपल्या सृजनशील व्यक्तीमत्वाची ओळख निर्माण करणारी.ज्ञानेश्वरीच्या ओवीतील संदेश प्रत्यक्ष जीवनात उतरला तर तो व्यक्तीला लेखक बनवतो.'यशस्वीअभिनेता' संकेत काटे यांचा प्रवास केवळ प्रसिद्धीचा झगमगाटात ही वास्तवाचे भान ठेवता येतं.मेहनत, धैर्य, आणि योग्य रणनीती असेल तर माणूस कोणत्याही क्षेत्रात यश मिळवू शकतो.यश फक्त स्वत:पुरते न ठेवता समाजसाठी वापरलं, तरचं ते खरं यश ठरतं.'गणोबाची देवराई'ताम्हिणीची वनराई टिकली पाहिजे.ही वनराई म्हणजे आपले कुटुंब.'अरण्यऋषीचा वारसदार' धन्य तो सुहास! त्यांने हा हिरवा दिपस्तंभ उभारला.वृक्षसंवर्धन,वसा आणि वारसा जपणारी पिढी हा अनमोल ठेवा आहे.या समकालीनत एक उद्विग्न करून जाणारी वास्तव कथा म्हणजे 'धगधगते नेपाळ'जर तुम्ही भ्रष्टाचार,महागाई, बेरोजगारी, आणि हुकूमशाहीकडे दुर्लक्ष केलंत,तर जनता तुम्हाला पदावरून नव्हे तर या जगातून तुमचा इतिहासच पुसून टाकेल.'न लगती सायस'माधव शेतकरी यांची कथा यातील विचार आचरणात आले पाहिजे.'इनाबाची पाऊलवाट'लेखक मामाच्या गावाची बालपणीची सहृदय आठवण सांगताना व्याकुळ होतात.ती पाऊलवाट आता नाही.पण मनातून जात नाही..'सोयीचे नाते' आज सारेच नी सगळेच आधुनिक सोशल नेटवर्किंग झाले आहेत.स्नेहाचे नाते राहिले नाही.ऑनलाईन फसवणूक करणारे भामटे हे ओळखा.'नीतीमंत श्रीमंत' समाजाला खरी गरज आहे ती नीतिवंत लोकांची.'आम्हा घरी धन' या कथेत नीती मूल्यात्मक विचार मांडले आहे.संताचे विचार आचरणात आणले पाहिजे.माणुस गेल्यावर ही विचाराचे धन कायम सहृदयी राहते.हे सोनं शब्दरूपी उरणं.शब्दाचंवैभव सांगणारी ही कथा.'समस्येत अडकलेलं गावं' 'राजगुरू नगरचा किशोर,या गावाचं गावंपण हरवत चाललं, शहरीकरण, प्रचंड ट्राफिक, गावाला रस्त्यांचा विळखा.अपघात.कुठेचं नियम नाही.गावं एका दोरीत नियमितपणे बांधून घेतलं की, माणूस सुखाने जगेल..शेवटी 'स्टेटसने दुभंगली नाती' ही कथा झणझणीत अंजन घालणारी कथा आहे.आजच्या वास्तवाचे विस्तव चटके जेव्हा बसतात.माणुस किती कोत्या विचारांचा झाला आहे.सर्रास खुन होता आहेत.माणूस सैतानी हैवानी मनाचा झाला आहे.अनेकांचे संसार उद्धवस्त झाले आहेत.हा अभाशी जगाचा तोंडवळा भंयकराच्या दारात उभा आहे."सोशल मीडिया हे खरंतर हे संवादसाठी बनलेलं साधन आहे.स्टेटस हे फक्त एका क्षणाचं चित्र असतं.तर नातं हा आयुष्याचा प्रवास असतो"(पृष्ठ 173) म्हणून संदीप राक्षेजी ने लिहिले."स्टेटस वाचून नाती नका बिघडवूआपुलकीचा धागा नका कधी तोडू गैरसमज, ईर्षा मनातून हद्दपार करा संवाद-प्रेमाने नाती सदैव जपा"साक्षेपी कथाकार संदिप राक्षे यांचा नवा कथासंग्रह.अतिशय मर्मग्राही आस्वादक प्रस्तावना संजय द.गोराडेयांची आहे.पाठराखण करतांना ते लिहितात "जीवनमूल्ये सांगणाऱ्या या कथा वाचकाला त्यांच्या आजुबाजुला घडणाऱ्या घटनांकडे एका वेगळ्या दृष्टिकोनातून पाहायला शिकवितात.कुणाच्या आयुष्यात आपण कधी निमित्तमात्र म्हणून आलो आहोत का? किंवा आपल्या आयुष्यात कुणी असं निमित्त ठरलं आहे का?या कथा वाचताना आपण ही आपल्या भूतकाळातील अशा काही क्षणांचा नक्कीच विचार कराल..(पाठराखण) चित्रकार अरविंद शेलार यांनी चिंतनीय तुकोबारायांचे मनोज्ञ दर्शक वेधक मुखपृष्ठ केले आहे.श्रध्देय लेखक संदिप राक्षे यांच्या अक्षर लेखनास हार्दिक शुभेच्छा.



**पुस्तक परिचय:-**
**डॉ प्रभाकर शेळके.**
**जालना**

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १६ नोव्हेंबर २०२५

# कार्यकर्त्यांचे 'असणे ' 'तपासण्या'च्या निमित्ताने...

दैनिक लोकसत्तासारख्या दर्जेदार दैनिकात (दि. 8 नोव्हेंबर) डोळसांपुढील अंधकार हा अंधश्रद्धेसंबंधी ऊहापोह करणारा अग्रलेख वाचण्यात आला. बहुसंख्य बुद्धिजीवी आणि बुद्धिवादी माणसं लोकसत्ताचा वाचकवर्ग आहे. सडेतोड लेखन करणारे जे काही बोटावर मोजण्याइतके वृत्तपत्र आहेत, त्यात लोकसत्ताचे नाव अग्रभागी आहे. महाराष्ट्रातील सामाजिक सद्यस्थितीचे साद्यंत वर्णन करीत लेखाचा समारोप करताना 'अंनिस कार्यकर्त्यांनी आपले असणे तपासून पाहण्याचा' सल्ला देण्यात आलेला आहे. डॉ. नरेंद्र दाभोळकरांचा खून झाल्यानंतर ही चळवळ उन्मळून पडेल, असा प्रतिगाम्यांचा कयास होता परंतु त्या नंतर मोठ्या जोमाने ती घराघरापर्यंत पोहोचते आहे, ही वस्तुस्थिती आहे. कार्यकर्ते आपापला नोकरी - व्यवसाय सांभाळून परिवर्तनाच्या विचाराने प्रेरित होऊन अंनिसचे कार्य अत्यंत प्रामाणिकपणे करतात, म्हणून त्यांना समाजातही अनेक सुहृदांकडून सहकार्य होत असते. चळवळीचे मुखपत्र 'अंधश्रध्दा निर्मूलन पत्रिका ' मध्ये चळवळीची दिशा दर्शविलेली असते. विविध स्तरांवर मेळावे, कार्यकारिणी बैठका महाराष्ट्रभर घेतल्या जातात. एक शिस्तबद्ध स्वरूपात अंनिस शिवाय एवढे मोठे कोणतेही संघटन माझ्या पाहण्यात नाही. शासनाने 'महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा यांना प्रतिबंध घालण्याबाबत व त्यांचे समूळ उच्चाटन करण्याबाबत अधिनियम 2013' ला काढला. नंतर अधिवेशनात त्याचे कायद्यात रूपांतर झाले. असे असले तरी पोलिस ठाण्यात दक्षता अधिकारी नेमायला 2024 उजाडले. अजूनही अनेक पोलिस अधिकाऱ्यांना या कायद्याची फारशी ओळख नाही. अनेक वृत्तपत्रे बुवा - बाबांच्या कार्यक्रमांना ठळक प्रसिद्धी देतात, तितकी अंनिस कार्यक्रमास देत नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. राज्यकर्त्यांची, समाजातील बहुसंख्य लोकांची अनास्था, तरुणांची अंनिसकडे डोळेझाक अशा अत्यंत प्रतिकूल स्थितीत अंनिस कार्यकर्ते प्रशिक्षण घेतात. सर्व जाती धर्मांतील बुवाबाजी विरोधात काम करीत असतानाच प्रखर विज्ञानवाद मांडणे, जोडीदाराची विवेकी निवड, वैज्ञानिक प्रयोग सादरीकरण, सर्पविज्ञान, फटाकेमुक्त दिवाळी, अशाप्रकारच्या विविध विषयांवर कार्यकर्ते आपला जीव धोक्यात घालून कार्यरत आहेत. वैज्ञानिक जाणीव जागृती करण्याच्या हेतूने सुरू असलेल्या विवेकवाहिनीच्या माध्यमातून अनेक महाविद्यालयांमध्ये विवेकी विचार पेरण्याचे काम सुरू आहे. हजारो वर्षांपासून अंधश्रद्धेचे ओझे मनावर घेऊन येथील लोक वावरत आहेत, ते एखादी जादूची कांडी फिरवल्यासारखे तातडीने ओझे फेकून देतील आणि ताबडतोब संपूर्ण समाज विज्ञानवादी बनेल अशी अपेक्षा आपण कशी काय करू शकतो? अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्यकर्ते आपल्या परीने प्रयत्न करीत असतातच. त्यांनी अधिक गतिमान होऊन कार्य करण्याची गरज आहे. म्हणजे त्यांच्याकडून अधिक अपेक्षा आहेत, अपेक्षेसाठी का होईना अंनिसची नोंद घेण्याइतपत त्यांचे कार्य आहे, असा त्याचा सकारात्मक अर्थ घ्यायला काय हरकत आहे? मग असे असेल तर लोकसत्ताला धन्यवादच दिले पाहिजेत!



**प्रा. शिवाजी वाठोरे**
(जिल्हा प्रधान सचिव, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, छ. संभाजीनगर)

# बिहारचा जनादेश व काँग्रेसचा उतरता आलेख

बिहार विधानसभेचे निकाल जाहीर झाले, आणि पुन्हा एकदा स्पष्ट झाले की भारतीय राजकारणातील परिवर्तनाची दिशा सतत बदलत असते. विशेषत: काँग्रेससारख्या ऐतिहासिक पक्षासाठी बिहार हे नेहमीच राजकीय, वैचारिक आणि सामाजिक घडामोडींचे केंद्र राहिले. भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील गांधींचे सत्याग्रह, भूदान आंदोलनाचा उदय, समाजवादी चळवळीची क्रांतिकारक परंपरा, गंगा नदीच्या सुपीक खोऱ्यातून उगवलेले राजकीय नेतृत्व, बुद्ध-महावीरांची चिंतनभूमी आणि जयप्रकाश नारायण यांच्या संपूर्ण क्रांतीने बिहारला अद्वितीय स्थान प्राप्त करून दिले. बिहारच्या विधानसभेचे नुकतेच जाहीर झालेले निकाल भारतीय राजकारणाला पुन्हा एकदा विचार करायला लावणारे ठरले आहेत. सामाजिक वैविध्य, जातीय समीकरणे, स्थलांतर, बेरोजगारी आणि संघटित नेतृत्व यांचा गुंता असलेल्या या राज्यात प्रत्येक निवडणूक ही देशाच्या व्यापक राजकीय निर्देशांकाची चाचणी बनून जाते. या पार्श्वभूमीवर सर्वाधिक चर्चेत राहिलेले वास्तव म्हणजे भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाची झालेली अभूतपूर्व घसरण. बिहारसारख्या राजकीय परंपरेच्या, विचारपर्वांच्या आणि आंदोलनांच्या भूमीत कॉंग्रेसचा इतिहास एकेकाळी अभिमानाचा अध्याय होता. परंतु आज तोच अध्याय पतन आणि पुनरावलोकनाची गरज याची जाणीव करून देतो. स्वतंत्र भारताच्या राजकारणात बिहार हे फक्त एक राज्य राहिले नाही, तर भारतीय लोकशाहीची सर्वात सजीव प्रयोगशाळा म्हणून तो उदयास आला. येथे झालेल्या विधानसभा निवडणुका केवळ सत्तासंघर्ष नव्हत्या, तर त्या सामाजिक न्याय, जातीय समीकरणे, आर्थिक सुधारणा आणि नेतृत्वाच्या धोरणांचे सखोल प्रयोग ठरल्या.

१९५२ पासून २०२५ पर्यंतच्या प्रवासात बिहारने काँग्रेसचे वर्चस्व, समाजवादी क्रांतींचे उदय, लालू प्रसाद यांचा सामाजिक न्यायाचा कालखंड, नीतीश कुमारांचे सुशासन मॉडेल आणि बदलत्या गठबंधन राजकारणाचे चढउतार अनुभवले आहेत. प्रत्येक निवडणुकीने बिहारच्या जनतेच्या आकांक्षा, स्वप्ने आणि असंतोषाला नवे रूप व नवे भाष्य दिले. आतापर्यंत झालेल्या एकूण १८ विधानसभा निवडणुकांमध्ये बिहारच्या जनतेने लोकशाहीची मुळे अधिकाधिक खोलवर रुजवली. १९५२ मध्ये बिहारमध्ये पहिल्यांदा विधानसभा निवडणुका झाल्या. त्यानंतर आजपर्यंत बिहारच्या राजकारणाने सत्तेचे चढ-उतार, मित्रपक्षांचे जमणे-तुटणे आणि जनमताच्या प्रवाहातील बदल यांचे थेट साक्षीदार झाले आहे. श्रीकृष्ण सिंह, कर्पुरी ठाकूर, जगन्नाथ मिश्र, लालू प्रसाद यादव आणि नीतीश कुमार यांसारख्या नेतृत्वाला जनता प्रत्येक टप्प्यावर तपासत राहिली आणि त्यामुळेच बिहारने भारतीय लोकशाहीला सतत बळकटी दिली. १९५२ च्या पहिल्या निवडणुकीत मतदानाचा टक्का अवघा ४२.६% होता. परंतु सात दशकांनंतर २०२५ मध्ये तो वाढून ६४.५ % वर पोहोचला. हे बिहारच्या वाढत्या राजकीय सजगतेचे प्रतीक आहे.

**बिहारमध्ये काँग्रेसचा आक्रसत जाणारा जनाधार**

कॉंग्रेस चा गत राजकीय वैभवाचा इतिहास पाहता १९५२ मध्ये पहिल्यांदा झालेल्या निवडणुकीत बहुतेक जागांवर काँग्रेसने विजय मिळवला आणि श्रीकृष्ण सिंह मुख्यमंत्री झाले. हा काळ स्वतंत्रता सेनानींवरील जनविश्वासाचा होता. तथापि, कमकुवत विरोधकांमुळे उत्तरदायित्वाची कमतरता जाणवत होती. १९५७ पुन्हा काँग्रेसचा विजय, पण अंतर्गत मतभेद वाढले. पण नेतृत्व बदलत राहले. दीप नारायण सिंह, बिनोदानंद झा सारखे नेते पुढे आले. या कालखंडात भ्रष्टाचार, गटबाजी आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेकडे दुर्लक्ष ही समस्या गडद होत गेली. १९६२ हा वैचारिक संघर्ष आणि नव्या राजकारणाचा उगम ठरला. २६४ जागांवर झालेल्या या निवडणुकीत काँग्रेससोबत समाजवादी पक्ष, जनसंघ, कम्युनिस्ट पार्टी यांचे बळ वाढले. या काळात शेतकरी -शेतमजूर प्रश्न, विचारधारात्मक वाद-विवाद आणि सामाजिक जागृती तीव्र झाली. १९६७ मध्ये गठबंधन युगाची सुरुवात होऊन काँग्रेस प्रथमच सत्तेबाहेर गेली. निवडणुकीत काँग्रेसला प्रथमच पराभव पत्करावा लागला. समाजवादी पक्ष,जनसंघच्याआघाडीनं सरकार स्थापन केले आणि महामाया प्रसाद सिन्हा मुख्यमंत्री झाले. तथापि, गठबंधन सरकारांची अस्थिरता आणि वारंवार बदलणारे मुख्यमंत्री यामुळे राज्यात राजकीय स्थैर्याचा अभाव निर्माण झाला. १९७७ च्या आपत्कालानंतरच्या निवडणुकीत जनता पार्टीने काँग्रेसचा ऐतिहासिक पराभव केला. कर्पुरी ठाकूर मुख्यमंत्री झाले. पुढील काळात मागास वर्गाच्या राजकीय सक्षमीकरणाला दिशादर्शन मिळाले आणि जातीय राजकारण अधिक तीव्र झाले. १९८० च्या दशकात काँग्रेसची पुनरागमन झाले. निवडणुकीत काँग्रेस १६९ जागा मिळवून पुन्हा सत्तेत आली. १९८५ ला १९६ जागा मिळवत यश संपादन केले. जगन्नाथ मिश्रा मुख्यमंत्री झाले. पुढे मुख्यमंत्री बदलत गेले. चंद्रशेखर सिंह,सत्येंद्र नारायण सिंह, यांनी शिक्षण सुधारणा, कर्जमाफीसारखे प्रयत्न केले. पण बेरोजगारी, भ्रष्टाचार आणि पलायन या समस्यांनी जनतेचा विश्वास ढळला. १९९० मध्ये जनता दलने निर्णायक विजय मिळवला आणि लालू प्रसाद यादव मुख्यमंत्री झाले. कॉंग्रसला ७१ जागा मिळाल्या. लालूंनी सामाजिक न्याय केंद्रस्थानी आणले, पण प्रशासन, कायदा-सुव्यवस्था आणि विकासाच्या बाबतीत गंभीर प्रश्न निर्माण झाले. पुढे कॉंग्रस पक्षाची स्थिती अधिकच नाजूक होत गेली. १९९५ मध्ये २९ जागी विजय मिळाला. २००० ला २३ जागा, २००५ मध्ये १० जागा, २०१० मध्ये ०४ जागा ,२०१५ मध्ये २७ जागा, तर २०२० मध्ये १९ जागा, तर २०२५ ला ६ जागा विधानसभेत मिळाल्या.

२०१५ ची विधानसभा निवडणूक काँग्रेससाठी एक अपवाद ठरली. महागठबंधनात नीतीश कुमार आणि लालू प्रसाद यादव यांच्या एकत्रित नेतृत्वाने काँग्रेसला जणू राजकीय ऑक्सिजन दिला. फक्त ४७ जागांवर लढून २७ जागांवर विजय मिळवणे— हे दोन दशकांतील काँग्रेसचे सर्वात मोठे यश होते. मात्र हे यश पक्षाच्या स्वतःच्या संघटनशक्तीचे नव्हते, तर पूर्णपणे गठबंधनाच्या ताकदीचे प्रतिफल होते.

२०२५ मध्ये ६० जागा वाट्यावर आल्या त्यापैकी ६ जागांवर विजय प्राप्त झाला. या निवडणुकीने तर काँग्रेसची स्थिती अधिकच दयनीय केली आहे. अनेक मतदारसंघांत काँग्रेसला मिळालेले मते नोटापेक्षा कमी निघाली. ही बाब स्वतःच सांगते की मतदारांच्या मनात काँग्रेस आता ‘पर्याय’ म्हणूनदेखील उरलेली नाही. स्थानिक पातळीवरील नेतृत्वाचा अभाव, मीरा कुमार सारख्या नेत्या कधी प्रचारात दिसल्या नाही. कि ज्या कॉग्रेस पक्षाने वडील व मुलीला नेहमी सत्तेजवळ ठेवले. निष्क्रिय झालेले संघटन आणि सतत आक्रसत जाणारा जनाधार यामुळे काँग्रेस बिहारमध्ये जवळजवळ अप्रासंगिक ठरली आहे. कॉंग्रस अध्यक्ष यांचे वय व त्यांची कॉंग्रेस पक्षावरील पकड किती मजबूत आहे हे दिसते. कॉंग्रेस पक्षाचा जनाधार निर्माण करणारा नेता म्हणजे खासदार राहुल गांधी होय. यांनी बिहार निवडणूक किती गांभीर्याने घेतली हे दिसते. देशात बिहारमध्येच विधानसभेच्या निवडणुका होत्या. इतर कोणत्याच राज्यात निवडणुका या वेळी सोबत नव्हत्या. त्यामुळे पूर्ण वेळ ठाण मांडून जर बहिण-भाऊ बिहार मध्ये बसले असते. तर चित्र वेगळे असते. शिवाय या काळात परदेश दौरा टाळता आला असता तरी या राष्ट्रीय पक्षाच्या हाती राज्यसभेत एखादा खासदार वाढवण्याचे बळ हाती लागले असते. हिंदी भाषिक पट्टा असल्यामुळे इतर प्रभावी नेते जसे सचिन पायलट, कान्हेया कुमार, इतर सर्व राष्ट्रीय कॉंग्रेस कार्यकारणीतील पदे घेणारे सर्व जर प्रामाणिकपणे बिहारमध्ये कमीतकमी सहा महिन्यापासून ठाण मांडून बिहार कॉंग्रेसला मदत व मार्गदर्शन करून जनहिताचे मुद्दे जनतेत मांडले असते तरआज चित्र वेगळे असते. दिल्लीतून सूचना देऊन हे शक्य नाही. राजद सोबत झालेली आघाडी व नंतर दोन्ही पक्षांनी किती प्रामाणिकपणे एकमेकांचे काम केले हा सुद्धा महत्वाचा प्रश्न उरतो. कॉंग्रेसच्या प्रमुखाभवती असणारे वलय हे जर काढून संघटन कसे वाढेल हे महत्वाचे काम कॉंग्रेसने करणे अपेक्षित आहे. काँग्रेससमोरची खरी कसोटी आता जागा वाढवण्याची नाही, तर स्वतःची *प्रासंगिकता टिकवून ठेवण्याची आहे*. त्यासाठी पक्षाला तातडीने संघटनात्मक पुनर्बांधणी करणे, सक्रिय कार्यकर्तावर्ग तयार करणे आणि नव्या सामाजिक-सांस्कृतिक समीकरणांमध्ये आपली भूमिका पुनःपरिभाषित करणे अत्यावश्यक आहे. गठबंधनांवर अवलंबून राहणे हा राजकीय मार्ग असू शकतो, परंतु त्या भरवशावर काँग्रेसचा पुनरुज्जीवनाचा मार्ग शक्य नाही. बिहार काँग्रेस आज ज्या वळणावर उभी आहे, तिथून पुढचे प्रत्येक पाऊल केवळ तिचे भविष्यच नव्हे, तर राज्याच्या राजकारणातील तिची उरलेली जागाही ठरवणार आहे.

बिहारची जात-राजकारणावर आधारित सामाजिक रचना नेहमीच अनन्य राहिली आहे. बुद्ध आणि महावीरांच्या करुणा व समतेच्या भूमीवर, सामाजिक न्याय हे केंद्रस्थानी राहिले पाहिजे होते. पण हळूहळू या मुद्द्यांचा वापर सत्ता हस्तगत करण्यासाठी सुरू झाला आणि काँग्रेस या परिवर्तनाशी जुळवून घेण्यात अपयशी ठरली. १९७० च्या दशकात जयप्रकाश नारायण यांच्या "संपूर्ण क्रांती" आंदोलनाने काँग्रेसविरुद्ध व्यापक असंतोष उभा केला. या चळवळीने तरुणांना पर्यायी राजकारणाची दिशा दिली. लोकनायक जयप्रकाशांच्या प्रभावामुळेच पुढे लालू प्रसाद यादव व नितीश कुमार यांची राजकीय ओळख मजबूत झाली. कर्पुरी ठाकूर यांनी सामाजिक आरक्षण आणि मागासवर्गीय राजकारणाला नवी दिशा देत बिहारची राजकीय वाटचाल बदलून टाकली.

त्याच विपरीत राहुल गांधी यांची भूमिका राष्ट्रीय पातळीवर आक्रमक आणि मुद्देसूद असली तरी बिहारसारख्या राज्यात स्थानिक नेतृत्वाचा अभाव आणि मजबूत संघटनाशक्ती नसल्याने त्यांचे राजकीय संदेश पोहोचत नाहीत. युवकांमध्ये सरकारविरोधी आणि रोजगारासंबंधी असलेल्या नाराजीला मर्यादित प्रमाणात दिशादर्शन करणे शक्य झाले, पण त्याचे रूपांतर मतदानात झाले नाही. काँग्रेसला बिहारमध्ये नेतृत्वाची सतत गरज होती. स्थानिक प्रश्न जाणणारे, समाजाच्या विविध घटकांशी संवाद साधणारे आणि सत्तेपर्यंत पोहोचण्यासाठी प्रभावी रणनीती आखणारे. पण पक्षाची धोरणात्मक भट्टी नेहमीच गारच राहिली.

एकूणच एकेकाळी बिहारसारख्या राजकीय-सांस्कृतिक वैभव असलेल्या राज्यात काँग्रेसचा प्रभाव दिवसेंदिवस कमी होत चालला आहे.या संपूर्ण इतिहासाकडे पाहिल्यास काँग्रेसच्या पतनामागे अनेक कारणे स्पष्टपणे दिसून येतात. मजबूत स्थानिक नेतृत्वाचा अभाव, संघटनात्मक कमजोरी, सामाजिक न्यायाच्या नव्या भाषेचा स्वीकार न करणे, युवा आणि स्थलांतरित वर्गाच्या मनात विश्वास निर्माण करण्यात असफलता, तसेच राजकीय रणनीतीतील विसंगती. १९५० ते २०२५ हा प्रवास केवळ एका पक्षाच्या घसरणीची कहाणी नाही, तर बिहारमधील राजकारणाच्या नव्या सामाजिक संरचनेचे प्रतिबिंब आहे.

राष्ट्रीय पक्ष काँग्रेसला आजही संधी आहे, परंतु ती संधी केवळ ऐतिहासिक वारसा सांगून मिळणार नाही. बिहारने सतत परिवर्तनाचा मार्ग निवडला आहे. या परिवर्तनाशी जुळवून घेत पुढील पिढीकडे धोरणात्मक आणि नवी राजकीय भूमिका घेऊन जाण्याची गरज आहे. अन्यथा बिहारसाठी २०२५ नंतरची काँग्रेसची कथा इतिहासाच्या पानांवरच मर्यादित राहण्याचा धोका आहे.



**डॉ .सुनील भारोडकर**
**नाशिक**
९१५८३ ५५०९३